29 AUG 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलशी सामंजस्य करार

## मधुमेहविषयक संशोधनाच्या चाचण्यांना मिळणार चालना

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात गेल्या पंधरा वर्षांपासून सुरू असलेल्या मधुमेहविषयक संशोधनातून उपयुक्त आयुर्वेदिक औषध निर्माण करण्यात यश आले आहे. आता अंतिम टप्प्यातील मानवी चाचण्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने नुकताच येथील डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलशी सामंजस्य करार केला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रुसा) अंतर्गत सुमारे ३५ लाख रुपयांचा महासंशोधन प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. 'स्टॉप डायबिटीस- डेव्हलपमेंट ऑफ न्यूट्रास्युटिकल प्रोडक्ट फॉर प्रिव्हेन्शन ऑफ प्रोग्रेशन ऑफ प्री-डायबिटीस टू डायबिटीस मेलिटस' असे या प्रकल्पाचे नाव आहे.

डॉ. अरविंदेकर यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांचा गट गेल्या १५ वर्षांपासून मधुमेहासंदर्भात आयुर्वेदिक उपचार पद्धती शोधण्यासाठी संशोधन करत आहे. त्यासाठी त्यांना येथील आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉ. विवेक हळदवणेकर यांचेही सहकार्य लाभत आहे. या संशोधनांतर्गत गेल्या तीन वर्षांपासून मधुमेहाची सुरुवात नेमकी कशामुळे होते, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यातून संशोधित करण्यात आलेल्या औषधाच्या विविध मान्यताप्राप्त प्रयोगशाळांत तसेच प्राण्यांवरही यशस्वी चाचण्या करण्यात आल्या आहेत. आता मानवी चाचण्यांसाठी डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलसमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रस्तावाला हॉस्पिटलच्या नोंदणीकृत नैतिक समितीची मान्यताही प्राप्त झाली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत गेल्या २३ ऑगस्ट रोजी झालेल्या या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांनी, तर डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले आणि अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

विद्यापीठाच्या संशोधनाचा समाजाला व्यापक लाभ होण्याच्या दृष्टीने या सामंजस्य कराराचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत डॉ. शिर्के यांनी याप्रसंगी व्यक्त केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या प्रकल्पाला सातत्याने दिलेल्या प्रोत्साहनामुळेच हा सामंजस्य करार होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या करारांतर्गत करण्यात येणाऱ्या चाचण्यांना रुसा (महाराष्ट्र) यांचे सहकार्य असेल. याअंतर्गत मधुमेहग्रस्त, मधुमेहपूर्व तसेच नियंत्रित अशा तीनही प्रकारच्या सुमारे शंभर रुग्णांवर चाचण्या घेण्यात येणार असून, त्यांच्यावरील औषधाच्या परिणामांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या प्रकल्पावर प्रा. शिम्पा शर्मा या सहप्रधान संशोधक म्हणून, तर डॉ. अरविंद गुलबके आणि डॉ. वेणुगोपाल हे सहप्रकल्प संशोधक म्हणून काम करत आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, डी. वाय. पाटील हॉस्पिटलतर्फे डॉ. व्ही. व्ही. भोसले आणि अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 AUG 2017
तरुण भारत

# तंत्रज्ञानातून शिवाजी विद्यापीठ प्रशासनाला गती

प्रतिनिधी
कोल्हापूर

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातूनच शिवाजी विद्यापीठ प्रशासनाला गती मिळू शकेल, असे मत नवी दिल्ली येथील असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजमधील संशोधन विभागाचे उपसंचालक प्राचार्य डॉ.अमरेंद्र पानी यांनी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ.पानी विद्यापीठाचे संगणकशास्त्र अधिविभाग आणि असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू), नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय इमर्जिंग ट्रेंडस् इन इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी इन युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्र-कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के अध्यक्षस्थानी होते.

प्र-कुलगुरु डॉ.डी. टी. शिर्के म्हणाले, युजीसीच्या ध्येयधोरणांनुसार विद्यापीठातील विविध विभागांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर



चांगल्याप्रकारे होत आहे. बदलत्या काळानुसार संगणकीय ज्ञान आत्मसात करण्याची गरज असल्याचे सांगितले.

**संशोधन विभाग उपसंचालक प्राचार्य डॉ. अमरेंद्र पानी यांचे मत**

संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.आर.मुधोळकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.के.एस.ओझा यांनी सूत्रसंचालन तर डॉ.यु.आर.पोळ यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, डॉ.जे.एस. बागी, अधिष्ठाता डॉ.पी.एस.पाटील, माजी परीक्षा नियंत्रक डॉ.बी.एम.हिर्डेकर, डॉ.व्ही.एस.कुंभार, प्रसन्न करमरकर, प्रसाद गोयल, परशुराम वडार, कबीर खराडे उपस्थित होते.

2 9 AUG 2017

Times of India

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# University to conduct orientation prog on answer book writing skills

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will organise orientation programmes for students on answer book writing skills in September.

A one-of-its-kind initiative, the programme will focus on awareness on the accuracy of the writing answers in final examinations and dos and don'ts of writing answers.

The programmes will be conducted in Kolhapur, Sangli and Satara districts. The dates, however, have not been finalised, varsity officials said.

Mahesh Kakade, director of the board of examinations and evaluation, told TOI, "This is our effort to create awareness among students for better writing in the examination. The answers cannot be defined just by the quantity; there has to be quality in it and this orientation programme precisely focuses on it.

## ART OF WRITING ANSWERS

- Writing proper question numbers
- Writing in readable handwriting
- Writing in a sequential manner
- Writing as per the question demands
- Using the full page



File photo

We have two experts -- one from the SUK and one from Pune, who will guide the students about the writing skills that they must show during the examination. Not only will it enhance their skills but it will also save the varsity paper wastage, he said.

Kakade said many students indulge in the writing long answers for the sake of writing. However, there are softwares that can detect the occurrence of repeated keywords in a passage. Such systems might get available in future and students need to be aware of smart writing.

He further said that the varsity had conducted an experimental survey in the October semester exam last year, which depicted the average use of answer sheets by students from a particular faculty.

Almost all the faculties were involved in the survey and a few answer sheets from each faculty was taken in consideration for it and their usage was recorded, he said.

According to the survey results, students did not use all the pages given in the answer sheets. For example, for the courses in BA, BCom and BSc, an answer sheet of 24 pages is provided during the exam. But, the survey showed that on an average 12.9, 14.5 and 14.2 pages were used for writing the respective exam by students.

The survey showed that for the engineering courses, for which an answer sheet of 40 pages is provided, merely 26.2 pages were being used during the semester exam. While for the MA course, the rate of blank papers went up to 45%, with only 21.3 pages being used in a 40-page answer sheet.

The university officials said the survey was done to find out the paper wastage in semester exams and whether the number of pages in an answer sheet, which have been found to be less used, be minimised.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 AUG 2017

महाराष्ट्र टाईम्स

# रोजगार मेळाव्यात २२३ उमेदवारांची निवड

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र व गोपाळकृष्ण गोखले कॉलेजच्यावतीने आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्यात २२३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. या मेळाव्यामध्ये ४०२ उमेदवारांनी सहभाग नोंदवला होता.

मेळाव्याचे उद्घाटन विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, प्रा. डॉ. मंजिरी देसाई मोरे, विजय माळी प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी होते.

मेळाव्यामध्ये १२ उद्योजकांनी सहभाग नोंदवला होता. त्यांच्याकडे ६१३ रिक्तपदे होती. उद्घाटनानिमित्त बोलताना डॉ. शिर्के यांनी अशा मेळाव्यांमधून बेरोजगार तरुणांनी स्वत:ला सिद्ध करुन करिअर उज्वल बनवावे, असे सांगितले. गोखले कॉलेजमधील प्लेसमेंट सेल व विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र यांनी संयोजन केले होते. प्रा. पी. बी. झावरे यांनी सूत्रसंचालन केले. एस. आर. घाटगे यांनी आभार मानले.



विद्यापीठ व गोखले कॉलेजच्यावतीने आयोजित रोजगार मेळाव्यात बोलताना प्र कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डावीकडून विजय माळी, जयकुमार देसाई, प्रा. डॉ. मंजिरी देसाई, प्रा. डॉ. ए. बी. गडकरी, डॉ. ए. एन. बसुगडे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 AUG 2017
पुढारी

# रोजगार मेळाव्यात २३ उमेदवारांची निवड

**कोल्हापूर :** विद्यापीठ कौशल्य विकास आणि रोजगार व उद्योजकता माहिती मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्यात २२३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. या मेळाव्यात ४०२ उमेदवारांनी सहभाग नोंदविला. विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने २७ ऑगस्ट रोजी रोजगार मेळावा झाला. यावेळी. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, सहायक संचालक विजय माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. रोजगार मेळाव्यास १२ उद्योजकांनी सहभाग नोंदवला यामध्ये ६१३ रिक्तपदे (तांत्रिक/अतांत्रिक) होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 AUG 2017
Times of India

# Varsity opens online link for new students

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has opened its online link for registration of new students.

According to SUK officials, they had received a few complaints regarding the online registration of students, hence the online link.

For professional courses, the directorate of technical education (DTE) has set the deadline of admission as August 31. For these students online profiling and eligibility submission will be open till September 10.

All the students who have been admitted after Higher Secondary Certificate repeaters result will have to pay regular eligibility fee and not the late fee.

It may be noted that over 87,000 first year students from undergraduate courses have registered for SUK's online profiling this year. The first year students while applying for the admission are asked to create their online profile.

Creating online profile requires the details of the course opted, subjects in the course along with some basic information.

The basic information is used to generate hall tickets during the semester examination.

The new students have to fill in the information, while the old students have to update it according to their academic progress.